# भारतीय संविधान

## समजून घेताना...



संपादक
प्रा. डॉ. सर्जेराव पद्माकर
शोभा चाळके-म्हमाने

संवाद प्रकाशन प्रा. लि.
anilnirmiti@gmail.com

# भारतीय संविधान समजून घेताना...

संपादक
डॉ. सर्जेराव पद्माकर
शोभा चाळके-म्हमाने

संवाद प्रकाशन, कोल्हापूर

भारतीय संविधान समजून घेताना...

संपादक

डॉ. सर्जेराव पद्माकर, शोभा चाळके–म्हमाने

Bhartiy Sanvidhan Samjun Ghetana...

Dr. Sarjerao Padmakar, Shobha Chalke-Mhamane

प्रकाशक

अनिल म्हमाने/शोभा चाळके

संचालक

संवाद प्रकाशन प्रा. लि.

८७३, क/२, सी वॉर्ड, सिद्धीश्री प्लाझा,

राजाराम रोड, कोल्हापूर- ४१६००२

मो. ०९८२२४७२१०९, ०९८९०५५४३४०

Email-anilnirmiti@gmail.com

प्रथमावृत्ती : १० नोंव्हेबर, २०१८

मुखपृष्ठ : गंगाधर म्हमाने

मुद्रक : मिरर ऑफसेट, कोल्हापूर

ISBN : 978-93-87322-09-6

स्वागतमूल्य : रु १२०/-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हिंदू कोड बिलामधील महिलांविषक कार्य
प्रा. डॉ. शोभा आबासाहेब मधाळे / ७४

घटनातज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान
प्रा. डॉ. आर.बी.चौगुले / ८२

डॉ. बाबासाहेब आंबेडकर: भारतीय संविधानाची निर्मिती
डॉ. अरुण पौडमल / ८८

संविधान की उपलब्धियाँ
डा. संतोष रायबोले / ९३

'शूद्र' कादंबरीत अभिव्यक्त झालेली संविधानिक मूल्ये
डॉ. स्वप्निल मारुती बुचडे / ९९

भारतीय संविधान व महिला
डॉ. सविता किर्ते उबाळे / ११५

भारतीय संविधान : नवसामाजनिर्मितीचा दस्तावेज
नितिन गणपती खांडेकर / १२०

संविधान नाकारण्यामागील मनू मानसिकता
प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे / १२४

भारत देशाची प्रतीके-भारतीयांचा स्वाभिमान
डॉ. सिंधू जयवंत आवळे / १२८

सामाजिक न्याय : एक सम्यक दृष्टीक्षेप
प्रमोद सुकुमार कराडे / १३३

# 'शूद्र' कादंबरीत अभिव्यक्त झालेली संविधानिक मूल्ये

डॉ. स्वप्निल मारुती बुचडे- कोल्हापूर

लेखक परिचय : -

सुधाकर शिवराम गायकवाड यांचा जन्म १३ नोव्हेंबर १९५३ रोजी झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराशी बांधील असणारा एक विचारवंत, आणि दलित पँथर या संघटनेच्या रूपाने आपल्या विचारांची अभिव्यक्ती करणारा एक समीक्षक असा त्यांचा उल्लेख करता येईल. त्यांच्या चिंतनाच्या केंद्रस्थानी नेहमीच मानवतावादी मूल्ये आणि विज्ञाननिष्ठ दृष्टी राहिली आहे. सर्जनशील ललित साहित्यलेखनाबरोबरच वैचारिक सिद्धांतन करणाऱ्या ग्रंथांचे आणि लेखांचेही लिखाण त्यांनी केले आहे. शूद्र (१९८०), डॉ. रावसाहेब कसबे एक मूल्यमापन (२००७), आंबेडकरी विचारधारा (संपा. २०१२), काळोखगर्भ (संपा. २०१२), निर्णायक युद्धानंतर (संपा. २०१२), माणूस त्याचा समाज आणि बदल (२०१३) ही त्यांची मौलिक ग्रंथसंपदा आहे. त्याचबरोबर अस्मितादर्श या त्रैमासिकात त्यांच्या काही कथाही प्रकाशित झाल्या आहेत. यामध्ये उद्वेग (१९७८), बळी (१९७९), शोध (१९८६), काजळी (१९८७) या कथांचा समावेश होतो.

अस्मितादर्श, परिवर्तनाचा वाटसरू, लोकानुकंपा, बहुजन संघर्ष, व्हिजन इंडिया या नियतकालिकात त्यांनी महत्त्वपूर्ण लेखन केले यामध्ये, 'डॉ. बाबासाहेब आणि लोकशाही', '१९८९चे रिपब्लिकन ऐक्य व विघटन', डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची समाजरचनेची सैद्धांत मांडणी', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेच्या संकल्पनेमागील मूलतत्त्वेफ 'धर्मांतराची पन्नास वर्षे', 'principals of social justice in Indian polity : a critical view in the contex of globalization ', 'रिपाई : एक उजवी हाहाकारी', 'जागतिकीकरण आणि दलितफ 'आंबेडकर व मार्क्सफ 'बुद्ध आणि मार्क्स काही आर्थिक प्रश्न', 'जातिव्यवस्थेतील बदल : डॉ. बाबासाहेब आंबेडकर नमुना' याबरोबरच अनेक संशोधनात्मक लेखांचा समावेश आहे. अशा या विचारवंताच्या आणि ललित लेखकाच्या शूद्र या कादंबरीचा नैतिक मूल्यांच्या संदर्भात परामर्श घेता येईल.

**कादंबरीतील आशय आणि मूल्यविचार : -**

साठोत्तरी मराठी साहित्यात अनेक प्रवाह निर्माण झाले. दलित साहित्य

प्रवाहानेही आपल्यावरील अन्याय, अत्याचार मांडला. जो पारंपरिक व्यवस्थेने हिंदू मानसिकतेतून दलितांवर केला. हिंदू व्यवस्था ही वर्ण आणि त्यातून निर्माण झालेल्या जातीवर आधारलेली आहे. ह्या जातींना कर्माची बंधने असतात. कोणत्या जातीने कोणती कर्मे करावीत हे ठरलेले असते. पण ह्या सगळ्या गोष्टींच्या बंधनामुळे माणसाचे माणूसपण मात्र नाकारले जाते. माणसाला पशुतुल्य वागणूक मिळायची. त्यांच्या विचारांना काही किंमत नसायची. ज्ञानार्जन करण्याची मुभा फक्त आणि फक्त ब्राम्हणांना होती. शस्त्र फक्त क्षत्रियांनी, व्यापार वैश्यानी आणि या तिन्ही वर्गांची सेवा ही शूद्रांनी करावी असा दंडक होता. मात्र यामध्ये ज्या शूद्र वर्गाचे लोक जगत होते त्यांचे दु:ख भयानक होते. त्यांच्या वाट्याला आलेली कर्मे त्यांना नाहक बळी पडून करावी लागायची. या शूद्र वर्गाचे नाकारले गेलेले माणूसपण त्यांना परत मिळून देण्याचे काम भारतीय संविधानाने केले. तत्पूर्वी हा मानवतावादाचा विचार भगवान गौतम बुद्धाने इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात मांडला. ज्या विचारात माणसाचे माणूसपण अबाधित राखले गेले. असाच विचार घेवून लिहिलेली कादंबरी म्हणजे सुधाकर गायकवाड यांची शूद्र ही कादंबरी होय. शूद्र म्हणून जगणारा वर्ण हा देखील माणूसच आहे आणि त्या वर्णातील लोकांना समाजात माणूसपणाची वागणूक मिळाली पाहिजे. यासारख्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून या कादंबरीची मांडणी केली गेली.

या कादंबरीचा नायक नागनाथ हा एका प्रवासावरून घरी परतत असताना काही घटना अशा घडतात की, त्याला शूद्र म्हणून जगणे नाकारले गेले पाहिजे याची जाणीव होते. नागनाथ हा जन्माने शूद्र आहे. तरीही त्याने धनुर्विद्येत प्राविण्य मिळवलेले आहे. त्याला या प्रवासात जो म्हातारा भेटतो तो त्याला असे काही प्रश्न विचारतो की, या प्रश्नाने नागनाथ दचकतो. तो वृद्ध नागनाथला म्हणतो, अरे तू शूद्र आहेस वाटते? (सुधाकर गायकवाड : २०१६ : ६). त्याच्या मनात शूद्रत्वाविषयी भिती निर्माण होते. अशा वेळी ती वृद्ध व्यक्ती आपणही शूद्र असल्याची जाणीव नागनाथला करून देते. आणि मग त्या दोघांमध्ये संवाद सुरु होतो. तो वृद्ध त्याच्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांची चर्चा नागनाथशी करतो. तो प्रश्न म्हणजे आपणही ब्राम्हण, क्षत्रियांसारखे माणूसच पण शूद्र म्हणून आपल्यावर जे अन्याय अत्याचार केले जातात ते का? मुळात आपण शूद्र म्हणून जन्माला का आलो? असे प्रश्न घेऊन मी आयुष्यभर भटकत राहिलो, असे तो वृद्ध सांगतो. आणि आपल्या बापाची जी हत्या झाली त्याचीही नोंद तो वृद्ध नागनाथला करून देतो. या सर्वांबद्दल नागनाथ आणि त्या वृद्धात चर्चा होते. तो वृद्ध नागनाथच्या मनात हे शूद्रत्व नष्ट करण्याची आशा प्रज्वलित

करतो. आणि नागनाथकडून एक वचन घेतो की, मी शूद्र म्हणून का जन्माला आलो? माझे माणूसपण का नाकारले गेले? या प्रश्नाच्या शोधासाठी तू आयुष्यभर प्रवास करशील. या प्रश्नाच्या शोध घेशील. नागनाथ याला होकारार्थी उत्तर देताच तो वृद्ध आपली जीवनयात्रा संपवतो.

यानंतरच्या टप्यात नागनाथ त्या वृद्धाने दिलेल्या वचनासाठी सतत धडपडत राहतो. आपल्या वस्तीतील लोकांना एकत्र करून आपण चांगले वागू, आपले माणूसपण टिकवू. ब्राह्मण क्षत्रियांकडून होणाऱ्या अन्याय अत्याचाराबद्दल त्यांना प्रतिकार करू असे सांगतो. ह्या कामात त्याच्या पाठीशी तरुण पिढी उभी राहते पण काही म्हाताऱ्या लोकांचा या गोष्टींना विरोध होतो. एकाच ध्येयाने प्रेरित झालेला नागनाथ वस्तीतील इतर लोकांना धनुर्विद्येचे प्रशिक्षण देतो. आणि सागला नावाचा युवक त्यांच्या तत्त्वज्ञानात्मक बाजूची बैठक भक्कम करण्यासाठी मदत करतो.

वस्तीतील सर्व युवक पारंगत होताच नागनाथ दक्षिणेतील लढ्यासाठी निघतो. वाटेत त्याचा एका ऋषीकन्येशी संवाद होतो. पण ती ऋषिकन्या त्याला शूद्र म्हणून पाणी पिण्यास मज्जाव करते. पण त्यावरही तो तिला संघर्षाच्या भूमिकेतून विरोध करतो. त्यावेळी ऋषी आश्रमातील ऋषीशिष्य आणि सेवक तेथे येतात. तेव्हा नागनाथ आपल्या धनुष्यातील बाण सपासप सोडतो आणि त्या सर्वांना मारून टाकतो. ती ऋषिकन्या मात्र बेशुद्ध अवस्थेत असते. नागनाथला तिच्याबद्दल प्रेम वाटत असते. पण ती घडलेली सर्व हकीकत राजाला जाऊन सांगते. राजाचे लोक नागनाथच्या वस्तीवर हल्ला करून सारी वस्ती बेचिराख करतात. ही बातमी घेऊन त्या संहारातून वाचलेला एक तरुण नागनाथला भेटतो तेव्हा मनातील संताप आणि द्वेष घेऊन तो बदला घेण्यासाठी निघतो. तेव्हा त्याला वाटेत बौद्ध भिक्कू भेटतात. ते त्याला मानवतावादी विचाराचे महत्त्व पटवून सांगतात. तेव्हा तो आपले धनुष्य तेथेच सोडतो. आणि त्यानंतर बुद्ध धम्माची परीव्रजा घेवून तो विश्वानंद म्हणून सर्वांत परिचित होतो. पण पुढे हा शूद्र आहे हे काही लोकांना समजते. तेव्हा राजा त्या भिक्कूंना त्याला भिक्कू संघात घेतले म्हणून मारून टाकतात. ह्या घटनेने त्या विश्वानंदाचा पुन्हा नागनाथ होतो आणि त्या भूमिकेतून तो त्या नगरीत पुन्हा संहारासाठी येतो.

नागनाथचा विश्वानंदाकडून पुन्हा नागनाथच्या भूमिकेत झालेला प्रवेश निश्चितच त्याच्या मनाला वळणे देण्याचे काम करतो. त्याच्या मनाची अवस्था किती भयाण आहे ते निदर्शनास येते. घर दार सारे नष्ट झाले. भिक्कू संघात प्रवेश केला. पण त्यांचाही घात झाला, त्यांचीही हत्या झाली. म्हणजे घरातून बाहेर पडताना फक्त आणि फक्त

'मी शूद्र म्हणून का जन्माला आलो' यासाठी त्याचा चाललेला प्रवास आणि दरम्यान त्या ऋषीकन्येबद्दल त्याच्या मनात निर्माण होणारा जिव्हाळा ह्या सगळ्या गोष्टी एका वेगळ्या नैतिक मूल्यांची मांडणी आपल्यासमोर करतात. नागनाथचा हिंदू धर्माकडून, बौद्ध धम्माकडे झालेला प्रवास आणि तिथून पुन्हा त्याचा आपल्यावरील अन्यायाच्या विरोधात संघर्ष हा मानवतावादासाठी असतो. ऋषीकन्येविषयी वाटणारी प्रेमभावना पुन्हा एका प्रश्नाची निर्मिती करते. काही वेळा अनैतिक वागणारा नागनाथ मात्र आधुनिक मूल्यांची पेरणी करू बघतो. असा विचार व्यक्त करणाऱ्या शूद्र कादंबरीची आधुनिक संविधानिक मूल्यांच्या पातळीवर मांडणी पुढीलप्रमाणे करता येईल.

**संविधानिक मूल्ये आणि कादंबरी : –**

**स्वातंत्र्य : –**

सुधाकर गायकवाड यांनी शूद्र या कादंबरीची मांडणी करत असताना अंतर्भूत केलेली मूल्ये ही आधूनिक मानवतावादी मूल्ये आहेत. 'नागनाथ' या पात्राच्या माध्यमातून जो विचार पोहचवण्याचा प्रयत्न करतात, तो माणसाला माणूसपण देणारा असा आहे. या कादंबरीत काही अशा गोष्टी घडतात की, नागनाथ टोकाची भूमिका घेतो. म्हणजे युद्धासाठी युद्ध, संहार, ऋषीकन्येविषयी त्याला वाटणारे प्रेम, तिच्याशी जवळीक साधण्यासाठी त्याचा प्रयत्न ह्या गोष्टी सोडल्या तर ही कादंबरी आधूनिक मानवतावादी मूल्यांचा पुरस्कार करते. साऱ्या घटनांचा स्वातंत्र्य या मूल्याच्या पार्श्वभूमीवर विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

नागनाथ हा शूद्र तरूण प्रवासावरून घरी परतत आहे अशी या कादंबरीची सुरवात होते. पारंपरिक मनुवादी संस्कृतीने या व्यवस्थेतील तळागाळातल्या लोकांवर जे अन्याय अत्याचार केले किंवा त्याच्यावर जी कर्मे लादली त्यातून इथला तळातला वर्ग पिचला गेला. याच पिचलेल्या वर्गाला माणूसपणाची जाणीव झाल्यानंतर काय होते? हे ही कादंबरी सांगू पाहते. प्रश्न आहे तो, मी शूद्र म्हणून का जन्माला आलो? किंवा मीही इतर माणसासारखा माणूस पण माझे माणूसपण का नाकारले गेले? हा प्रश्न आणि याच प्रश्नासाठी या कादंबरीची मांडणी झालेली दिसून येते.

कादंबरीचा नायक नागनाथ हा धनुर्विद्येत प्राविण्य मिळवलेला युवक त्याच्या मनात उर्जा निर्माण करण्याचं काम वाटेत भेटलेला वृद्ध करून देतो. भारतीय संविधानाने स्वातंत्रोत्तर काळात ज्या मानवतावादी मूल्यांचा पुरस्कार केला. त्यातील स्वातंत्र्यासाठी, समतेसाठी, न्यायासाठी आणि बंधुत्वासाठी ही धडपड चालू आहे. याच मूल्यांसाठी नागनाथच्या मनात ती वृद्ध व्यक्ती उर्जा निर्माण करते. त्याला आपण माणूस आहे ही

जाणीव करून देते. तो वृद्ध नागनाथच्या मनात स्वातंत्र्याचा विचार निर्माण करतो. वृद्ध नागनाथला माणूस एकटाच या जीवसृष्टीत आला आणि एकटाच जाणार हे सांगताना म्हणतो, ...अरे मी एकटाच आलो आणि आता एकटाच जाणार उद्या कोणी पक्षी माझ्या हाडांच्या मोळीचा हा जीर्ण देह घेऊन उडून गेला तर थोड्या दुःखाने डोळे ओले करणारे माझ्या रक्ताचे असे मला कोणीच नाही. पण हा, मनात आणले तर, अंगणात पाऊल टाकण्यासाठी माझा हात धरणारी नातवंडे आता मला निश्चितच आली असती. पण तसे गवत खाणारे आयुष्य मी मुद्दामच निवडले नाही. फक्त एक प्रश्न त्या प्रश्नासाठी आयुष्य खांद्यावर घेऊन मी भटकत राहिलो. सर्व दिशांच्या राज्यात व जेथे सागराची अंतिम हद्द संपली जाते, अशा बेटातही मी जाऊन आलो. परंतु मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. (गायकवाड सुधाकर : २०१६ : ४-५) तो वृद्ध घरच्या कोणत्याही प्रश्नात अडकून न पडता बाहेर पडला. तो अनेक प्रश्न घेऊन चिंतन करण्यासाठीच. त्याच्या चिंतनाच्या मुळाशी नेमका मानवतावादी मूल्यविचार होता. नागनाथला तो वृद्ध म्हणतो, तू शूद्र आहेस का? वृद्ध; नागनाथला तू शूद्र आहेस का? असे विचारताच नागनाथ चिंतीत होतो. त्याच्या मनात एक भीती निर्माण होते. आणि त्याच्या मनाची अवस्था अस्वस्थ होते. तो प्रसंग असा, ...वृद्धाच्या त्या प्रश्नाने तो विजेप्रमाणे दचकला आपण निर्जिव होत आहोत, असे त्यास जाणवू लागले. ब्राम्हण-क्षत्रियांच्या पायाखाली रगडलेले कलंकित आयुष्य केवळ आपल्या वाट्याला का यावे याचे विचारमंथन त्याच्या डोक्यात सुरु झाले. जर हा वृद्ध ब्राह्मण असेल तर याच्या डोळ्यासमोर उभे राहून बोलल्यामुळे आता आपणाला कोणती शिक्षा होईल, याचाच तो विचार करू लागला आणि त्याला त्याची भीतीही वाटली. निबिड अरण्यात राहून आपण स्वसामर्थ्याने धनूर्विद्येत प्राविण्य मिळवले, प्रचंड असिम सागरात एखाद्या जलप्राण्याने किंचित हालचाल केली तरी दोन योजने दूर राहून त्या प्राण्याला छेद करू शकू असे आपण सामर्थ्य मिळवले तरी पण वेगदंन राजवाड्यात याची खबर गेली असती तर आपले साधे हाड आपल्या आईस अथवा पतीस पहावयास मिळाले नसते. म्हणून नगरात जाताना आपण हातात कधीच धनुष्य घेतले नाही. मग आता आपण जे धनुर्विद्येत प्रावीण्य मिळवले त्याचा उपयोग काय? आता हा म्हातारा नुसती फुंकर मारली तर दहा योजने दूर फेकला जाईल, परंतु याने एक शब्द थुंकला तरी आपला शेवट होऊ शकेल हे कसले आयुष्य? (गायकवाड सुधाकर: २०१६ : ६-७) त्या वृद्धाच्या एका प्रश्नाने नागनाथाच्या मनात निर्माण झालेल्या काहुराची मांडणी समोर येते. पण ज्यावेळी तो वृद्ध म्हणतो की, मी ही शूद्र आहे त्या

वेळी नागनाथ दचकतो. पण वृद्ध हा चिंतीत होऊन काही सांगू पाहतो, एक मी जन्माला आलो ते शूद्र म्हणून आणि कदाचित शूद्र म्हणूनच मरणार. ज्या दगडावर कावळ्या-कुत्र्याने विष्ठा टाकावी त्या क्षुल्लक दगडानेही आपला अवमान करावा, आपल्याला छळावे असे आयुष्य आपल्या वाट्याला का यावे ? ब्राहमण-क्षत्रियासारखाच आपला देह असताना केवळ 'शुद्रफ म्हणून प्राण्यासारखी सहज आपली हत्या का केली जावी ? आणि शूद्र म्हणूनच जन्माला का यावे ? हेच प्रश्न घेऊन मी आयुष्यभर भटकत राहिलो. आता तू माझ्या श्वासांचा भेटलास म्हणून; म्हणून रक्तात डसणारी ही व्यथा तुला सांगितली. (गायकवाड सुधाकर : २०१६:७) या त्या वृद्धाच्या सांगण्याने त्याच्यात माणूसपणा किती भरलेला आहे. त्याच्या संघर्ष हा कसा स्वातंत्र्यासाठी आहे, माणूसपणाच्या मागणीसाठी आहे याची जाणीव होते.

त्या वृद्धाला आपल्या शूद्रत्त्वाची जाणीव बापाच्या झालेल्या हत्येनंतर होते. वृद्ध नागनाथच्या मनात स्वातंत्र्याविषयी स्वाभिमानाविषयी जाणीव निर्माण करतो. तो नागनाथला म्हणतो, अरे, चार-पाच घास आतड्यात घालून दगडासारखे जगण्यापेक्षा थोडे स्वाभिमानाने का जगत नाहीस? हा पण त्यासाठी छातीवर बाण घेण्याची तयारी असली पाहिजे. म्हणजे तू स्वत:च्या आयुष्यावरचा 'शूद्र' हा डाग झटकून देशील आणि आपल्या समाज-बांधवानाही तू निर्दय गुलामगिरीतून मुक्त करू शकशील. (गायकवाड सुधाकर: २०१६ : ९-१०) असे म्हणून तो वृद्ध नागनाथाच्या मनात स्वत:वरील व समाजावरील अन्यायाची चीड आणि त्याविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा निर्माण करतो. ह्या प्रेरणेनेच तो स्वातंत्र्याची आस मनी बाळगून म्हणतो की, आता तुम्ही म्हणालात, छातीवर बाण घेण्याची तयारी असली पाहिजे. परंतु मी छातीवर बाणच घेणार नाही तर ब्राम्हण क्षत्रियांनी व्यापलेली सर्व भूमीच उलटी करीन. (गायकवाड सुधाकर : २०१६ : १०) आता नागनाथ ह्या व्यवस्थेविरुद्ध पेटून उठला आहे तो वृद्ध हा संघर्ष करण्याचे त्याच्याकडून वचन घेतो आणि आपली आयुष्य यात्रा संपवतो.

घरी आल्यानंतर तोच विचार नागनाथला सतावत असतो की, मी शूद्र म्हणून जन्माला का आलो? तो आपल्या वडिलांना हा प्रश्न विचारतो. तेव्हा ते पारंपरिक हिंदू मानसिकतेतून उत्तर देताना म्हणतात की, अरे तू अजून लहानच आहेस वाटते ? परमेश्वराच्या पायापासून आपला जन्म झाला. तेव्हापासून छातीवर 'शूद्र' हा कलंक घेऊन आपण वावरू लागलो. ( गायकवाड सुधाकर: २०१६ : १६) या उत्तराने नागनाथ सुन्न होतो आणि सांगतो की, आकाशात

उडणाऱ्या पक्षाचा एकाच बाणाने मी डोळा फोडू शकतो. पण रणांगणात मी शूद्र असल्याने लढू शकत नाही. आपला सागला इतका हुशार कोणत्याही ब्राह्मणाचे तोंड बंद करू शकेल इतकी बुद्धी त्याच्याजवळ असतानाही केवळ शूद्र म्हणून वेदांचे अध्ययन करण्याचा त्याला अधिकार नाही असे का? असा प्रश्न उपस्थित करतो आणि शेवटी आधुनिक विचाराने स्वातंत्र्यासाठी प्रेरित झालेला नागनाथ म्हणतो, बाबा आयुष्यावर शूद्राचा डाग घेऊन गवतासारखे जगण्यापेक्षा छातीत बाण घेऊन श्वास थंड केलेला काय वाईट? माझ्या पाठी कोणी येवो अथवा न येवो पण मी तरी शूद्र म्हणून जगणार नाही. (गायकवाड सुधाकर : २०१६ : १७) नागनाथ आधुनिक मूल्यांचा उद्घोष करतो किंबहुना लढण्यासाठीही तो सज्ज होतो आणि त्याचा पुढचा प्रवास सुरु होतो.

नागनाथ वस्तीतील एका म्हाताऱ्याला हे विचार सांगतो. त्यावर तो म्हातारा म्हणतो, तू मघाशी म्हणालास की, मी शूद्र म्हणून जगणार नाही. मग कोण म्हणून जगणार? ब्राह्मण म्हणून की क्षत्रिय म्हणून? आणि समज तू क्षत्रिय म्हणून जगू लागलास तर ब्राह्मण-क्षत्रिय तुला मानतील का? की राजा तुझी धनुर्विद्या पाहून तुला सेनापती करील? अरे असा खुळचटासारख बोलू नकोस. (गायकवाड सुधाकर. : २०१६ : १८) पण नागनाथ चिडतो, कारण तो या आधुनिक मूल्यांसाठी संघर्ष करण्याच्या भूमिकेतून प्रेरित झाला असतो. तो म्हणतो, भले मला माझी वस्ती सोडावी लागली तरी हरकत नाही. पण मी शूद्र म्हणून जगणार नाही. (गायकवाड सुधाकर.: २०१६ : १९) म्हणजे इथून पुढे आपण स्वाभिमानाने जगू आणि जगणार आहोत अशीच भूमिका तो घेतो व उलटा ब्राह्मण- क्षत्रियांच्या खांद्याला खांदा लावून जगण्याला तो स्वाभिमान म्हणतो.

स्वातंत्र्यासाठी उभारलेल्या संघर्षात तो वस्तीतील युवकांना सामिल करून घेतो. त्यात तो धनुर्विद्येचे प्रशिक्षण देतो. सागला हा युवक सर्वांना तत्त्वज्ञानात्मक विचार सांगण्याचा प्रयत्न करतो. ज्यात आधुनिक मूल्ये असतात. स्वातंत्र्याच्या विचाराने प्रेरित झालेला छन्ना म्हणतो की, तुम्हाला या सूरक्षित भिंतीच्या आड किड्यासारखे जगायचे असेल तर खुशाल जगा, आम्ही जगणार नाही. नाथ, तू मुळीच घाबरू नकोस. आम्ही तुझ्यासाठी सर्व तरूण सैन्य उभे करतो. पण तू म्हणतोस त्याप्रमाणे आयुष्याचा चिखल करणारा हा शूद्र डाग नाहीसा करायचा म्हणजे करायचा. (गायकवाड सुधाकर: २०१६ : २०)

याप्रकारे समतेसाठी आणि सर्व रूढी-श्रद्धांना झिडकारून स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. आम्हालाही समाजात माणसाप्रमाणे वागणूक मिळाली पाहिजे यासाठी प्रयत्नशील असतात.

आपल्या वस्तीबरोबरच हा आधुनिक विचार सर्वत्र पोहचवावा यासाठी वेयंगण या दक्षिणेतील राज्यात निघाला. तो म्हणतो की, दक्षिणेत वेयंगन राज्यात जाऊन तेथील बांधवास आपण रंगवत असलेले निळे क्षितिज दाखवावे असा विचार तो सर्वांना सांगू लागला. (गायकवाड सुधाकर: २०१६ : ३०) निळे क्षितिज म्हणजेच आधुनिक प्रबोधनपर, मानवतावादी विचार होय. या विचारासाठी तो सतत प्रयत्नशील राहील अशी शपथ/शब्द त्या वृद्धाला दिलेला असतो. म्हणून तो हा विचार सर्व ठिकाणी पोहचण्यास आपल्यावरील शूद्रत्वाचा डाग नाहीसा करण्यासाठी दक्षिणेत निघतो.

नागनाथ दक्षिणेत जात असताना त्याला तहान लागते म्हणून तो एके ठिकाणी थांबतो. तहानेने व्याकूळ झालेला नागनाथ एका ऋषिकन्येकडे पाण्यासाठी विनंती करतो. पण ती ऋषींना विचारण्यास निघून जाते. ती ऋषींना सांगते की, बाबा, एक शूद्र तहानेने व्याकूळ झाला आहे. मी त्याला पाणी देऊ का? (गायकवाड सुधाकर: २०१६:३९) त्यावर ऋषी म्हणतात की,...अग, कोणाला तरी तिकडे पाठवून त्या शूद्राला हाकलून दे. नाही तर तो आपल्या झऱ्यास स्पर्श करून पाणी विटाळील त्याशिवाय आपणाला दुसरे स्वच्छ पाणी कुठे नाही. (गायकवाड सुधाकर: २०१६:३९) म्हणजे शूद्राने पाण्याला स्पर्श केला तर पाणी विटाळते. माणसासारख्या माणसाचा स्पर्श पाणी विटाळतो. हे ऐकताच ती ऋषिकन्या नागनाथला हाकलून देते. पण त्या कन्येचे नागनाथ ऐकत नाही तिच्यावर चालून जातो. आणि तिच्या डाव्या गालावर जोरदार प्रहार करतो. ती किंचाळते. त्यावेळी ऋषी आश्रमातील शिष्य सेवक धावत येतात. नागनाथवर हल्ला करतात. नागनाथ आपल्या बाणाचे सपासप वार करून त्यांची हत्या करतो. पण त्यावेळी ती ऋषिकन्या मात्र बेशुद्ध पडते. त्या अवस्थेत तो तिच्याशी जे कृत्य करतो ते कुठेतरी अनैतिक वाटते ते वर्णन असे, धनुष्य खाली ठेऊन त्याने तिला बाहूत घेतले आणि पावसाप्रमाणे तिच्यावर तो पाशविपणे जळजळीत सुडाने चुंबनांचा वर्षाव करू लागला. (गायकवाड सुधाकर: २०१६ : ४२) नागनाथच्या या कृत्याचा विचार निश्चितच नैतिक अनैतिकतेच्या चौकटीत करणे गरजेचे आहे. तो सर्वांना आपल्यावर हल्ल्याचा प्रतिकार म्हणून मारून टाकतो.

पण या ऋषीकन्येला तो तसेच का सोडतो? हा प्रश्न अनुत्तरीत राहतो! नागनाथने ऋषीसह सर्वांची हत्या केली तेही अनैतिकच होय.

या घटनेमुळे नागनाथला खूप वाईट परिणाम भोगावे लागतात. ती ऋषिकन्या राजाला जाऊन सगळी हकीकत सांगते. तो राजा आपल्या सैन्याकरवी नागनाथाच्या वस्तीवर हल्ला करतो. त्या वस्तीतील सर्वांना संपवून टाकतो. वस्तीवर घडलेली सारी हकीकत विसपाल येवून नागनाथला सांगतो. विसपाल एकटाच जीवंत राहिलेला असतो. तो ही हकीकत सांगतो आणि आत्महत्या करतो. हे समजताच नागनाथ याचा बदला घेण्यासाठी सुडाच्या प्रवृतीने परतत असतानाच त्याला बौद्ध भिक्कू भेटतात. त्याची अवस्था पाहून भिक्कू त्याला म्हणतात की, अरे, भुंग्याने लाकूड पोखरावे त्याप्रमाणे तुझा देह दु:ख, व्यथा, वेदना यांनीच पोखरलेला आहे. अशा तऱ्हेने तू कुठेही गेलास तरी दु:खाची सीमा ओलांडता यायची नाही. हे विश्व असीम आहे. जन्म आणि मृत्यू यामधील प्रदेशात दु:खाचे तृण आहे हे तृण तुडवत जाण्यापेक्षा थोडा मन:संयम करून व हाताची थोडी फडफड करून तू आयुष्यभर चार-पाच रंग का उधळून घेत नाहीस ? म्हणजे तुला थोडे का होईना लाल फळाचे सुख व समाधान लाभेल. (गायकवाड सुधाकर: २०१६ : ६५-६६) याप्रकारे त्याचे मन परिवर्तन करण्याचा प्रयत्न बौद्ध भिक्कू सब्बबुद्ध करतात. भिक्कू सब्बबुद्ध त्याला बुद्धविचाराची जाणीव करून देतात. ते नागनाथच्या मनातील द्वेष, तिरस्कार नाहीसे करण्यासाठी त्याला उपदेश करतात. भिक्कू सब्बबुद्ध म्हणतात की, ज्या अर्थी तू शस्त्र बाळगतोस त्या अर्थी तुझ्या मनात राग, द्वेष, मत्सर, लालसा व भीती आहे. अरे, हे सर्व दु:खाचे मूळ आहे. माणूस जन्मल्याबरोबर त्याच्यासंगे एखाद्या काळ्या तिळाप्रमाणे दु:ख त्याच्या आयुष्याला चिकटलेले असते. परंतु दु:ख नाहीसे करीत मनुष्याला अंतिम निर्वाण मिळवायचे असते. (गायकवाड सुधाकर : २०१६ : ६७) या विचारात नागनाथ भारावून गेला. तो भिक्कू सब्बबुद्ध काय म्हणतात याकडे बारकाईने लक्ष देवून ऐकू लागला. ते सतत त्याला त्याच्या स्वातंत्र्यावर व आधुनिक मूल्यसंकल्पनांवर गदा आणणाऱ्या विचाराबद्दल समजावून सांगत होते.

पण पुढे एका ब्राह्मणाला समजते की, एक शूद्र भिक्कू संघात सामील झाला आहे. ज्याने ऋषी आणि सेवकांची हत्या केली. ही बातमी जेव्हा राजाला समजते. तेव्हा राजा सैन्याकरवी सर्व भिक्कूंना मारून टाकतो. मात्र भिक्कू

विश्वानंद (नागनाथ) तेवढे जिवंत राहतात. पण या संहाराने तो भिक्कुचा वेश टाकतो, विचार करतो आणि धनुष्य उथलुन संहारासाठी पुन्हा नगरात जातो. या ठिकाणी मात्र भिक्कुचा विचार त्याच्या ठिकाणचा नाहीसा होतो. तो द्वेषाने सूड बुद्धीने नगरात संहार करतो. त्यावेळी पुन्हा ही ऋषिकन्या भेटते. त्यावेळी ती ऋषीकन्या नागनाथला पुन्हा शूद्र म्हणूनच वागणूक देते.

अशा पद्धतीने ही कादंबरी स्वातंत्र्यासाठी नागनाथचा चाललेला संघर्ष चित्रित करते. मी शूद्र म्हणून जन्माला का आलो ? या प्रश्नासाठी त्याचा चाललेला संघर्ष त्यासाठी त्याने उभारलेली चळवळ या सर्व गोष्टींची चर्चा करते. काही ठिकाणी नागनाथचे वर्तन अनैतिक ठरते मात्र तरीही या कादंबरीत नागनाथच्या रूपाने सुधाकर गायकवाड यांनी आधुनिक मूल्यविचारांची मांडणी केली आहे.

**समता : –**

पारंपरिक व्यवस्थेने वर्णाधारित, जातीआधारित समाज रचनेच्या माधमातून एका विशिष्ट संस्कृतीच्या अधिपत्याखाली माणसाचे माणूसपण नाकारणारी अनेक बंधने घातली. ही बंधने त्यांच्या एकूणच आचरणाला आणि जीवितालाही घातक अशीच होती. भगवान गौतम बुद्धाने मांडलेला समतेचा आणि मानवतेचा विचार घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी मूल्ये संविधानात समाविष्ट केली त्याने आचरणाच्या संदर्भात नवी चौकट निर्माण झाली. पण त्याचा आचरणात किती प्रभाव पडला हा प्रश्न मात्र शिल्लक राहतो.

शूद्र या कादंबरीत सुधाकर गायकवाड काही प्रसंग असे चित्रित करतात की, नागनाथ समतेसाठी, स्वातंत्र्यासाठी झगडत असतो, तर व्यवस्था त्याला ह्या गोष्टी नाकारत असते. नागनाथला भेटलेले वृद्ध गृहस्थ त्याच्या वडिलांच्या संदर्भात घडलेला प्रसंग सांगतात. जो त्यांच्यावर किती वाईट पद्धतीने अत्याचार झाले याचे वर्णन करताना म्हणतो की, ... त्या वेळी काळा पक्षी कावळा असतो इतपत मला कळत होते. जन्मताच आम्ही कर्मदरिद्री. शेत नांगरून धान्य पिकवावे म्हंटले तर मुद्दामच दिलेली जमीनही दगडांची. आठवते पाऊस पडतानाही त्या वेळी ओंजळभर धान्य पिकत असे तेही त्या वेळी मिळाले नाही. आता आतडे पिळवटत होते. म्हणून माझे वडील नगरात गेले. एका ब्राह्मणाच्या अंगणापासून दूर अशा उकिरड्यावर खरकटे पडले होते आणि कुत्रे ते मिटक्या मारीत खात होते. वडिलांनी ते खरकटे ओंजळीत घेतले. परंतू ते दृश्य एका ब्राह्मणाने पहिले. ब्रह्मान्नासं स्पर्श करून ते विटाळले म्हणून माझ्या वडिलास

घोड्याच्या आसुडाने मारत राजाकडे नेले आणि राजाने काय शिक्षा दिली, सांगू तुला ? आईला व मला बोलावून, आमच्या समोर एका उन्मत्त दासाने माझ्या वडिलांच्या शरीरातून भाला खुपसून मांस काढले नि दोन बोटांच्या अंतरावर केलेल्या प्रत्येक लाल जखमेत तप्त लोहाचा रस ओतला ! इतके बोलून तो वृद्ध थांबला. आता तो व्याकुळला असावा कदाचित त्याच्या खोल डोळ्यात ओल असावी. शब्दातले पाणी झटकून तो पुढे म्हणाला तेव्हापासून मी घर सोडले. केवळ शूद्र म्हणून बापाची क्रूर हत्या का व्हावी, हा पहिला प्रश्न घेऊन मी भटकत राहिलो. (गायकवाड सुधाकर : २०१६ : ८) हा प्रसंग पाहिला तर केवळ शूद्र म्हणून माणसाचे माणूसपण नाकारले. उष्टा खरखट्या अन्नाला स्पर्श केला म्हणून त्याला हाल हाल करून मारले गेले ही कोणती पद्धती. पण तो मुलगा म्हणजे नागनाथला भेटलेला वृद्ध होय. प्रश्नासाठी आयुष्यभर भटकत राहिला. केवळ शूद्र म्हणून माझ्या वडिलांची हत्या व्हावी. आणि आपल्या स्वातंत्र्यासाठी, समतेसाठी तो त्याचा प्रवास चालू करतो. तो हा प्रश्न नागनाथवर सोपवून आपली यात्रा संपवतो. नागनाथच्या प्रवासादरम्यान त्याला जी ऋषीकन्या भेटते तीसुद्धा नागनाथची शूद्र म्हणून हेटाळणी करते. नागनाथ तहानेने व्याकुळ झाला असतानाही त्याला पाणी पिऊ देत नाही. ती ऋषीकन्या आपल्या वडिलांची परवानगी आणण्यासाठी जाते वडिलांना म्हणते की, बाबा, एक शूद्र तहानेने व्याकुळ होऊन वाटेत तळमळतो आहे. मी त्याला पाणी देऊ का ? (गायकवाड सुधाकर: २०१६ : ३९) त्यावर ऋषी उत्तर देतात की, ...मुली एक वेळ तू तडफडत असलेल्या कुत्र्यास पाणी पाजलेस तर तुला मोठे पुण्य मिळेल. परंतु ज्याच्या अंगाअंगावर जखमा केल्या आहेत, त्या शूद्राला पाणी पाजून ते आयुष्यातले एखादे पुण्य का कमी करून घेतेस ? आणि माहित आहे तुला, शूद्राची तुझ्यावर किंचितशी सावली पडली तरी योद्ध्याने शत्रूचे शीर उडवावे त्याप्रमाणे माझी तपच्छर्या क्षणात निष्फळ होईल. म्हणून तू असले पापकर्म करू नकोस. उलटे सेवकाला सांगून तू त्याला हाकलून दे. तिने कंबरेवरचा माठ आत आश्रमात ठेवला. ती बाहेर येताच ऋषी अचानक आठवण झाल्याप्रमाणे घाईत म्हणाले, ...अग, कोणाला तरी तिकडे पाठवून त्या शूद्राला हाकलून दे. नाहीतर तो आपल्या झऱ्यास स्पर्श करून पाणी विटाळील. त्याशिवाय आपणाला दुसरे स्वच्छ पाणी कुठे नाही. (गायकवाड सुधाकर: २०१६:३९) शूद्र म्हणून नागनाथला पाणी नाकारले. पण कन्येला सांगताना ऋषी म्हणतात की, शूद्राने पाणी प्राशन

केले तर ते विटाळेल! अरे माणसासारखा माणूस तो ज्याला शूद्रत्व बहाल करून त्याच्यावर अन्याय अत्याचार करणे, त्याला असमानतेच्या संदर्भात वागणूक देणे हे समतेच्या तत्त्वास नाकारणे आहे.

पुढे समतेचा विचार सांगताना बौद्ध भिक्कू सब्बबुद्ध म्हणतात, तू मघा म्हणालास, आयुष्यावरचा शूद्र हा डाग नाहीसा करण्यासाठी तू हातात शस्त्र घेतलेस. परंतु त्याकरिता तुला हातात शस्त्र घेण्याची आवश्यकता नाही. जन्मतःच परमेश्वराने तुझ्या आयुष्यावर शूद्र हा डाग दिला, हा समज चुकीचा आहे. या जगात परमेश्वर नावाची चीज नाही. मग तुला शूद्र हा डाग तो कसा देईल ? तुझ्या आयुष्यावर 'शूद्रफ हा डाग धुर्त व स्वार्थी लोकांनी मुद्दाम चिकटवला आहे. तुला गुलाम बनवून तुझ्याकडून आत्यंतिक सेवा करून घेण्यासाठी तुझ्या आयुष्यावर त्यांनी शूद्र हा डाग उकवला. पुढे तुला आपल्या दैन्याची, दुःखाची जाणीव होऊन तू विद्रोह करू नयेस, म्हणून त्या गोष्टीला त्यांनी देवाचा व दैवाचा मुलामा दिला. तू ज्ञान मिळवून आपले दुःख व दैन्य म्हणजेच जे दुःख व दैन्य ज्यांनी तुझ्या पदरात टाकले, त्यांच्याविरुद्ध बंड करू नये, म्हणून तुला त्यांनी ज्ञानापासून वंचित केले. शस्त्रविद्या शिकून शास्त्राच्या बळावर तू त्यांना आव्हान देऊ नयेस, म्हणून त्यांनी व्यापार उदीम यांपासून वंचित केले.... (गायकवाड सुधाकर: २०१६ : ६९-७०) भिक्कू सब्बबुद्ध नागनाथला सर्व गोष्टी समजावून सांगतात. ज्यावर नागनाथचा विश्वास बसतो. भिक्कू सब्बबुद्धांना आपला समावेश शिष्य म्हणून करण्याची विनंती करतो. तेव्हा भिक्कू सब्बबुद्ध नागनाथचे भिक्कू विश्वानंद असे नामकरण करून परिव्रजा देतात आणि भिक्कू संघात समाविष्ट करतात. आता तो नागनाथ राहिलेला नसतो तर तो बौद्ध भिक्कू विश्वानंद होतो.

नागनाथच्या प्रवासात एक योगी त्याला भेटतो तो योगी आणि नागनाथ चर्चा करतात. पण ज्यावेळी नागनाथ शूद्र आहे हे त्यांना समजते त्यावेळी तो योगी स्फोट व्हावा त्याप्रमाणे म्हणतो की, ...मला प्राप्त झालेले ज्ञान प्रथम शूद्रास सांगितले. माझी संपूर्ण तपच्छर्या वाया गेली. अरे शूद्रा चांडाळा! तू आपली कक्षा ओलांडून माझे ज्ञान ग्रहण केलेस शंभर जन्म तू रक्तपिती होऊन मरशील. तुला मुक्ती नाही. कदापि नाही. (गायकवाड सुधाकर: २०१६:४०) यानुसार तो योगी नागनाथला तू शूद्र असून माझ्याशी तत्त्वज्ञानाच्या गप्पा करतोस हे रुचले नाही, म्हणून तो नागनाथला शाप देतो. असा तो योगी मानवतेला काळीमा फासणाऱ्या ह्या कृत्याला जबाबदार ठरतो. माणसासारख्या माणूसपणाला नाकारण्याची भूमिका हा योगी घेतो. पण त्यानंतर

नागनाथला ज्यावेळी बौद्ध भिक्खू भेटतात त्यावेळी मात्र बुद्ध तत्त्वज्ञानातून व्यक्त होणाऱ्या आचरणाची त्याला कल्पना होते. भिक्खू त्याला स्पर्श करताच तो भारावला. ते आपल्या कलंकित गणल्या गेलेल्या शरीरास आत्मीयतेने स्पर्श करतात, हे पाहून त्याला अधिकच आश्चर्य वाटते व तो गहिवरून आला. (गायकवाड सुधाकर : २०१६:६६) भिक्कुंनी नागनाथला स्पर्श केला याचे त्याला नवल वाटते. कारण इतरत्र समाजात शूद्रांना मिळणारी वागणूक आणि ह्या भिक्कुंना आपण शूद्र आहे हे माहित असतानाही त्यांच्याकडून आपणाला मिळणारी वागणूक ही कशी भिन्न आणि मानवतापूर्ण आहे याची जाणीव होते. पुढे प्रश्न करतात की, समज, असाच बाण कोणीतरी तुझ्या दिशेने सोडला तर तू छाती काढून त्या बाणासमोर उभा राहशील का ? (गायकवाड सुधाकर: २०१६ : ६६) तर नागनाथ उत्तर देतो की, नाही, बाण माझ्या दिशेने येताच माझा जीव वाचविण्यासाठी मी आडोसा शोधून त्याच्या आड उभा राहीन. (गायकवाड सुधाकर: २०१६:६६-६७) अशा या प्रश्नोत्तरानंतर भिक्खू सब्बबुद्ध नागनाथला जीवनाचे तत्त्वज्ञान सांगतात ते म्हणतात, म्हणजे तुझा जीव तुला प्रिय असतो. ज्याप्रमाणे तुला जगावेसे वाटते त्याचप्रमाणे इतर प्राणी, पक्षी, माणसे यांनाही जगावेसे वाटते स्वत: जगणे व दुसऱ्यालाही जगू देणे हा सर्व प्राणिमात्रांचा मूलभूत अधिकार आहे. मग दुसऱ्या जीवाची हत्या करणारे असे हे भयानक शस्त्र तू जवळ का बाळगतोस ? (गायकवाड सुधाकर: २०१६ : ६७) असे सांगून भिक्खू सब्बबुद्ध त्याच्या मनाचे परिवर्तन करण्याचा प्रयत्न करतात आणि मुळात बुद्धाचे तत्त्वज्ञान आणि विचार कसा समतेसाठी आहे याचाही जाणीव करून देतात.

कोणत्याही वर्णाच्या व्यक्तीने खड्डा खणला तर सारखेच पाणी सर्वांना मिळेल तर सर्वात मतभेद, उच्चनिच्च भाव का ? या प्रश्नाला धरून ते म्हणतात की, ज्याप्रमाणे व ज्या अर्थी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे त्याच्यापेक्षा नीच किंवा क्षत्रिय उच्च आणि वैश्य व शूद्र हे सारखे व समान आहेत. (गायकवाड सुधाकर: २०१६ : ७२) हा बुद्धविचार किंवा तत्त्वज्ञान हे समानतेचे, मानवतेचे आहे. त्याची जाणीव ते नागनाथला करून देतात त्यानंतर नागनाथ भिक्खू संघात समाविष्ट होतो. अशाप्रकारे एका बाजूला प्रस्थापित हिंदू मानसिकता समानतेसाठी नाकारत असताना इकडे मात्र बुद्ध विचार कोणताही दुजाभाव न दाखवता सर्व मानव समान आहेत अशी भूमिका घेतो. या भूमिकेतूनच सुधाकर गायकवाड यांनी शूद्र या कादंबरीत मांडलेले विचार आधुनिक मानवतावादाची पेरणी करणारे आहेत. म्हणून ह्या कादंबरीत समतेसाठीचे संघर्ष आणि त्यातून मिळणारा मार्ग हा कसा आहे याचे चित्रण येते हे या निमित्ताने नोंदवावे लागते.

**बंधुता : –**

शूद्र या कादंबरीत आधुनिक मूल्यांची सुधाकर गायकवाड यांनी केलेले बांधणी ही विशेषत्वाने उल्लेखावी लागेल. बंधुत्व कसे येते याची काही वर्णने कादंबरीत येतात. ती अशी आहेत, पहिल्यांदा ज्यावेळी तो वृद्ध भेटतो त्यावेळी तो जो विचार नागनाथला सर्वत्र पोहचवण्यासाठी विनंती करतो, त्यामुळे नागनाथला प्रेरणा मिळते. नवा विचार घेऊन नागनाथ आपल्या वस्तीत येतो. सर्वांना ह्या आधुनिक विचारांची बाजू पटवून सांगतो. त्यावेळी काही वृद्ध मंडळी या नागनाथच्या विचाराला विरोध करतात. दरम्यान उन्ना नावाचा म्हातारा म्हणतो की, परमेश्वराने क्षत्रियांच्या हाती शस्त्र दिले, ब्राह्मणांच्या हाती वेद दिले, नि आपल्या हाती त्यांची सेवा करण्याचे कर्म दिले, ते काय परमेश्वर खुळा होता म्हणून ? परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध काही करणे म्हणजे स्वत:साठी स्वत:च गळपास तयार करणे. म्हणून सांगतो, तू माझे ऐक नि हे डोक्यावर घेतलेले खूळ काढून टाक. (गायकवाड सुधाकर: २०१६ : १८) असा हा उन्ना म्हातारा पारंपरिक विचारांचे प्रतिनिधीत्व करतो. यावर नागनाथ उत्तर देतो की, भले मला माझी वस्ती सोडावी लागली तरी हरकत नाही. पण मी शूद्र म्हणून जगणार नाही. (गायकवाड सुधाकर:२०१६ : १९) ही तो प्रतिज्ञा करतो आणि इथून पुढे मी स्वाभिमानाने जगेण असेही सांगतो. यापुढचा प्रवास हा या मूल्यांसाठी झालेला आहे.

पण या सगळ्या गोष्टी सुरु असताना मन्या नावाचा युवक जवळच बसला होता. तो लगेचच उन्ना म्हाताऱ्याला उत्तर देतो. आणि नागनाथच्या पाठीशी उभे राहण्यासाठी म्हणतो, तुम्हाला या सुरक्षित भिंतीच्या आड किड्यासारखे जगायचे असेल तर खुशाल जगा, आम्ही जगणार नाही. नाथ, तू म्हणतोस त्याप्रमाणे आयुष्याचा चिखल करणारा हा शूद्र डाग नाहीसा करायचा म्हणजे करायचाच. (गायकवाड सुधाकर:२०१६ : २०) असा छक्का नागनाथला प्रेरणा देतो. नागनाथच्या पाठीशी उभे राहण्याची आशा व्यक्त करतो. तिथून पुढे नागनाथ सर्वांना एकत्र करून या आधुनिक विचारांसाठी एकत्र येतात. नागनाथ सर्वांना धनुर्विद्येचे प्रशिक्षण देतो ते लढण्यासाठी आणि वैचारिक बैठक पक्की करण्यासाठी. सागला हा युवक सर्वांची तत्त्वज्ञानात्मक बाजू भक्कम करतो. असा हा बंधूभावाने आधुनिक मूल्य विचारासाठी चाललेला संघर्ष चित्रित होतो.

पुढे ज्यावेळी नागनाथला बौद्ध भिक्कू भेटतात त्यावेळी नागनाथची अवस्था पाहून भिक्कू कोणताही भेदभाव न करता बंधुत्वाच्या नात्याने ते नागनाथची सुश्रुषा करतात. तो प्रसंग असा, बोलता बोलता भिक्खुचे नागनाथाच्या उजव्या खांद्यावर

झालेल्या जखमेकडे लक्ष गेले. त्यांनी ती जखम धुवून त्यावर औषधी लेप दिला. आपले अंग वेदनेने ठणकत आहे, असे सांगताच भिक्कूंनी त्याला दोन वनस्पती मुळ्यांचा अर्क प्यायला दिला. नंतर त्याला जेवण देऊन विश्रांती घेऊ दिली. (गायकवाड सुधाकर:२०१६ : ६७) या पद्धतीने भिक्कू सब्बबुद्ध यांनी नागनाथची बंधूभावनेने केलेली सुश्रुषा ही निश्चितच त्याला उर्जित करणारी ठरली. भिक्कू सब्बबुद्ध यांनी दिलेला विचार हाही त्यासाठी कारणीभूत ठरला. त्यातून प्रेरणा घेऊन शेवटी नागनाथ हा बुद्ध विचाराकडे वळतो तो भिक्कू सब्बबुद्धांकडून परिव्रजा घेऊन भिक्कुसंघात सामील होतो. अशा पद्धतीने काही प्रसंगातून हा बंधुत्त्वाचा विचार मांडता येईल.

न्याय : –

सुधाकर गायकवाड यांनी शूद्र या कादंबरीत नागनाथचा जो प्रवास चित्रित केले आहे. ते निश्चितच पारंपरिक विचाराकडून आणि प्रस्थापित मूल्यांना झुगारून समतेसाठी, स्वातंत्र्यासाठी, बंधुत्त्वासाठी झगडताना दिसून येते. हा आधुनिक विचार नागनाथला बुद्धविचारात पहावयास मिळतो. हिंदू मानसिकतेतून शूद्र म्हणून हिणवल्या गेलेल्या लोकांचे माणूसपण नाकारले गेले. पण बुद्ध विचारातील मानवतावादी दृष्टी मात्र ही जाणीव कुठेही निर्माण होऊ देत नाही. समतेची व बंधुत्त्वाची वागणूक निर्माण करते. बुद्ध धम्म माणसाला चांगल्या पद्धतीने वागण्याची संधी देतो.

हाच मानवतावादी विचार बुद्धाच्या विचारात आहे अशी जाणीव नागनाथला होते. आणि तो या विचाराकडे वळतो. त्याला हिंदू व्यवस्थेने आपल्यावर शूद्र म्हणून जे जे अन्याय केले त्याची कल्पना येते. प्रवासात त्याला भेटलेल्या व्यक्ती यात त्या वृद्धाने सांगितलेल्या त्या विचाराने त्याला प्रेरणा मिळते. त्या प्रेरणेने तो परिवर्तनासाठी बाहेर पडतो. दरम्यान त्याचा अनेकांशी संवाद, संघर्ष होतो. यात ऋषिकन्या आणि इतर व्यक्तींची पारंपरिक मानसिकता चित्रित होते. मग भिक्कू सब्बबुद्ध भेटल्यानंतर त्यांनी सांगितलेल्या विचाराने नागनाथमध्ये परिवर्तन होते. त्याला तो विचार माणसाला माणूस म्हणून वागवणारा वाटतो. हा विचार न्यायाच्या दृष्टीने महत्त्वाचा होय.

एकूणच पारंपरिक विचाराकडून आधुनिक विचाराकडे आलेला नागनाथचा प्रवास हा या आधुनिक मूल्यविचारालाच केंद्रस्थानी ठेवून होताना दिसतो. म्हणून ही कादंबरी आपल्यात आधुनिक मानवतावादी मूल्ये चित्रित करते असे म्हणावे लागेल.

सारांश

आंबेडकरी चळवळीतील विचारवंत आणि आपल्या मांडणीच्या केंद्रस्थानी आधुनिक मूल्यविचार ठेवून मांडणी करणारे एक सर्जनशील लेखक म्हणून सुधाकर

गायकवाड यांचा उल्लेख करणे गैर ठरणार नाही. कारण त्यांनी शूद्र या कादंबरीत जी मांडणी केली ती पाहता ही भूमिका घेता येईल.

नागनाथच्या रूपाने सुरवात होणारे या कादंबरीचे कथानक पारंपरिक आणि आधुनिक मूल्यविचारांची चिकित्सा करते. वर्णव्यवस्थेने आणि त्यातून निर्माण झालेल्या जातीव्यवस्थेने माणसाची कशा पद्धतीने घुसमट केली याची मांडणी ही कादंबरी करते. नागनाथ हा शूद्र म्हणून जगणे फेकून देवून माणूस म्हणून आम्हाला समाजात वागता आणि वावरता यावे यासाठी प्रयत्नशील असतो. त्यासाठी प्रवासात भेटलेल्या वृद्धाकडून त्याला प्रेरणा मिळते. शूद्र म्हणून व्यापाऱ्याने वस्त्र दिले नाही हाही प्रसंग त्याच्या जिव्हारी लागतो. आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात आपण आवाज उठवायचा ही भावना मनी घेऊन त्याचा प्रवास सुरु होतो. त्यासाठी त्याचा वस्तीतील लोकांशी संघर्ष, वस्तीतील तरुणांचा त्याला असणारा पाठींबा या साऱ्या गोष्टी घेऊन तो आपण शूद्र म्हणून न जगता माणूस म्हणून जगले पाहिजे अशी तो सर्वांना विनंती करतो.

वस्तीतील तरुणांना धनुर्विद्येत पारंगत करतो तत्त्वज्ञानात, आधुनिक विचारात पारंगत करतो. आणि स्वतः दक्षिणेत हा विचार पोहचवण्यासाठी निघून जातो. वाटेत ऋषीकन्येबद्दल त्याला वाटणारी प्रेमाची भावना ही वेगळी जाणीव देवून जाते. ऋषींची केलेली हत्या आणि त्यासाठी राजाकडून वस्तीवर झालेला हल्ला त्याचबरोबर बौद्ध भिक्कूवर झालेला हल्ला त्यात त्यांचा झालेला मृत्यू आणि शेवटी पुन्हा बुद्ध विचाराकडून द्वेष भावना मनी घेऊन त्याने राजाच्या नगरावर केलेला हल्ला ह्या सगळ्या गोष्टी तो फक्त आणि फक्त आधुनिक मानवतावादी विचारांसाठी करतो त्याचा हा संघर्ष फक्त आपल्या स्वातंत्र्यासाठी, समतेसाठी असतो. पण ह्या सगळ्या विचारात शेवटी एक वाक्य येते की, पाणी मात्र असले डाग धुण्यासाठी अनंत युगापासून तत्परतेने तयार असते एवढे मात्र खरे. (गायकवाड सुधाकर: २०१६ : १००) असे म्हणून पाणी कोणालाही भेदभाव करत नाही. उच्च नीच भाव दाखवत नाही. ते कोणती जात बघत नाही सर्वांना सारखाच समान न्याय देते ही जाणीव शेवटी गायकवाड करून देतात. म्हणूनच ही कादंबरी आधुनिक मूल्यविचार जोपासताना दिसून येते असे म्हणावे लागते.

संदर्भ :

गायकवाड सुधाकर, २०१६ : शूद्र, सृजन प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती